# MARATHI (LL)

## SOLUTION : PRACTICE ACTIVITY SHEET 2

**प्र. 1. (अ)**

**(1)** (i) साखर

(ii) लिंबाचा रस

(iii) अंधेरीच्या गोठ्यात

(iv) गिरगावच्या

**(2) (i)** **पंतांना शेजाऱ्यांनी दिलेले भाताचे पदार्थ**

- सोकोजीने → कोळंबीभात
- पसरटवारांनी → वडाभात

**(ii)** पंतांना दोरीवरच्या उड्या थांबवाव्या लागल्या; कारण खालच्या मजल्यावरील मंडळींनी दुष्टपणाने व आकसाने तक्रारी केल्या होत्या.

**(3)** जेव्हा पंतांनी वजन घटवण्याचा शेवटचा निकराचा प्रयत्न केला, त्या वेळी त्यांनी केलेल्या कृती फारच विनोदी आहेत. त्यांना सडपातळ झाल्याची स्वप्ने पडू लागली. जेवणाचे ताट पुढे असताना न खाता ते उठू लागले. साखर पाहिली की त्यांना खूप राग येऊ लागला. लिंबाचा रस म्हणजे त्यांना अमृत वाटू लागले. ताज्या दुधासाठी ते अंधेरीच्या गोठ्यात जाऊ लागले. नि सर्वांत कहर म्हणजे बिनसाखरेचा आणि बिनदुधाचाच नव्हे; तर बिनचहाचाही चहा ते पिऊ लागले. ही पंतांची झालेली परिस्थिती पाहून मला खूप हसू आले.

**प्र. 1. (आ)**

**(1)** **लेखकाच्या बालपणीचा दिनक्रम**

- (१) गल्लीतल्या मुलांना जमा करून भर उन्हात विटीदांडू, पतंग उडवणे.
- (२) कधी कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे.
- (३) कैऱ्या, पेरू पाडून त्याचा भरपूर स्वाद घेणे.
- (४) घरातील जळणाच्या लाकडाची बॅट व स्टंप करून व जुना पुराणा बॉल घेऊन क्रिकेट खेळणे.

**(2)** (i) तिथेच झोप लागायची आणि जाग यायची ती आईच्या प्रेमळ कुशीत.

(ii) घरात पाऊल ठेवतो न ठेवतो तोच पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा यथेच्छ वर्षाव व्हायचा.

**(3)** लेखकाचे वडील पोलीस खात्यात होते. परिस्थिती गरीब होती. वडील मुलांना खेळणी घेऊन देऊ शकत नव्हते. लेखक लहानपणी दिवसभर खेळून संध्याकाळी घरी येत असत. आई त्यांची तक्रार वडिलांकडे करी. मग लेखकाला शिस्त लागावी म्हणून वडील लेखकाच्या पाठीत धम्मकलाडू व चापटपोळ्यांचा वर्षाव करीत. वडिलांची जेव्हा वडगावला बदली झाली, तेव्हा त्यांनी लेखकांना पुण्यात त्यांच्या चुलत्याकडेच ठेवले. हेतू हा की लेखकांनी चांगले शिकून मोठा अधिकारी व्हावे. यामागे त्यांची तळमळ व शिस्त होती. लेखकांचे वडील शाळा व अभ्यास याबाबतीत फारच कडक होते. एकदा लेखक शाळा चुकवून क्रिकेट सामना पाहत बसले; तेव्हा वडिलांनी घरी येऊन लेखकांना संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले. या वडिलांच्या शिस्तीमुळे लेखकांनी शाळा कधी चुकवली नाही.

**प्र. 1. (इ)**

**(1)** **गाडगेबाबांनी यांची पूजा केली.**

(i) भिकाऱ्यांची
(ii) रोग्यांची
(iii) पांगळ्यांची
(iv) जनावरांची

**(2)** **लोकसेवेच्या मंदिरात संतांनी केलेली कार्ये**

- संत नामदेव → भिंती बांधल्या
- संत तुकाराम → कळस चढवला

**प्र. 2. (अ)**

**(1) (i)** **कवींचे प्रत्येकी दोन दिवस यांत गेले**

- दोन दिवस वाट पाहण्यात गेले
- दोन दिवस दुःखात गेले

**(ii)** (1) हात

(2) अश्रू

**(2)** (i) भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली.

(ii) दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो.

**(3)** (i) चंद्र – शशी

(ii) आयुष्य – जीवन

(iii) साहाय्य – मदत

(iv) शाळा – विद्यालय.

**(4)** 'दोन दिवस' या कवितेमध्ये कवी नारायण सुर्वे यांनी कामगारांच्या दाहक जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे.

कष्टकऱ्यांच्या जीवनातील व्यथा मांडताना कवी म्हणतात – आयुष्य तर अवघ्या चार दिवसांचे आहे. त्यातील अर्धे आयुष्य सुखाची वाट पाहण्यात व अर्धे आयुष्य दु:ख झेलण्यात गेले. सुखाची भूल दुरून चकाकणाऱ्या चंद्रासारखीच होती; पण भाकरीचा चंद्र शोधण्यात आयुष्य बरबाद झाले. खूप कष्ट उपसले. दैन्यदारिद्र्याकडे आयुष्य गहाण पडले. कधी माझ्या कर्तृत्ववान हातांनी अभिमानास्पद कामगिरी केली; पण बऱ्याचदा हात जायबंदी केले गेले. अश्रूंनी मला मित्रांसारखे समजावले. झोतभट्टीत पोलाद शेकावे तसे माझे सबंध आयुष्य शेकून निघाले. सारा समाज आपलासा केला, तरी सर्व आयुष्य दु:खात गेले.

**प्र. 2. (आ) कविता –** औक्षण

(1) **प्रस्तुत कवितेच्या कवयित्री** ⟶ इंदिरा संत.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ देशाचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या सीमेवरील जवानाविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी ही कविता आहे.

(3) **प्रस्तुत कवितेतील ओळींचा सरळ अर्थ** ⟶ खरे तर तुझ्यावर जीव कुर्बान करावा, असे तुझे शौर्य आहे. तुझ्यावर जीव ओवाळावासा वाटतो; पण आमचा जीव इवलासा, लहान, दुबळा आहे. तुझ्या पराक्रमाच्या कथेपुढे आमच्या लहानशा जीवाचे मोल ते काय? आमच्या जीवाची शान अगदी मामुली आहे.

(4) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ देशाच्या सीमेवर जागरूकपणे पहारा देणाऱ्या व प्रसंगी जीवाची बाजी लावणाऱ्या सैनिकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी ही कविता आहे. सैनिक देशाची राखण करतो. अशा सैनिकाचा जनता कसा सन्मान करू शकते? ती फक्त त्याचे हित चिंतून त्याचे औक्षण करू शकते. त्याला अमरत्वाचा आशीर्वाद देऊ शकते. हा विचार माझ्या मनाला भिडला आणि म्हणून मला ही कविता आवडली.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ** – (i) आसवे – अश्रू (ii) असंख्य – अगणित

(iii) औक्षण – ओवाळणी (iv) दुबळे – अशक्त

**किंवा**

**कविता –** हिरवंगार झाडासारखं

(1) **प्रस्तुत कवितेचे कवी** ⟶ जॉर्ज लोपीस.

(2) **प्रस्तुत कवितेचा विषय** ⟶ माणसाने आपले आयुष्य झाडासारखे जगावे, हे सूत्र या कवितेतून मांडले आहे.

(3) **प्रस्तुत कवितेतील ओळींचा सरळ अर्थ** ⟶ माणसाने झाडासारखे प्रसन्न व हिरवेगार असावे असे सांगताना कवी म्हणतात – पहाटे पहाटे झाडाच्या पानावरून वहीच्या पानावर उतरलेले दवाचे थेंब कवीला जाणवतात आणि त्याला कविता सुचते हा भावार्थ सूचित होतो.

(4) **कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** ⟶ 'झाड' हा निसर्गाचा एक घटक आहे. झाडाची परोपकारी वृत्ती, अविचल वृत्ती, दानशूरता, आनंदी वृत्ती हे गुण मानवाने घ्यावेत, असे ही कविता सांगते. विविध गुणांनी संपन्न असलेल्या वृक्षासारखे तुम्ही व्हा, हे सहजपणे सांगणारी ही कविता मला आवडते. सोपेपणाने शिकवण देण्याची ताकद या कवितेमध्ये आहे.

(5) **कवितेतील शब्दांचे अर्थ –** (i) व्रत – वसा (ii) पक्षी – पाखरू

(iii) पान – पर्ण (iv) शरीर – अंग

**प्र. 3.**

**(1)** पाण्याचा अभाव, रेताड जमीन आणि कडक कोरडेपणा ही वाळवंटी प्रदेशाची वैशिष्ट्ये आहेत. पाण्यावाचून जीवन फुलू शकत नाही. परंतु वाळवंटी प्रदेशात तेथील विशेष जीवसृष्टी आहे. वनस्पती आहेत व त्या वनस्पतींवर जगणारे प्राणी आहेत. वाळवंटी प्रदेशाला मरुभूमी म्हणतात. वाळवंटी प्रदेशात वर्षातून एकदाच पाऊस पडतो, तर कधी तीन-तीन वर्षे तो बेपत्ता असतो. अवर्षणाच्या या काळात वाळवंटी प्रदेश भकास व ओसाड असतो. जीवन उजाड होते. मग एक दिवस पाऊस पडतो आणि जादू होऊन झाडाझुडपांना पालवी फुटते. बियांमधून रोपे उगवतात. रोपांवर भरगच्च फुले फुलतात. त्या काळात हा ओसाड भूप्रदेश बगिच्यासारखा दिसतो. स्वप्नासारखा काही काळ टिकतो. जणू वाळवंटात स्वर्गच अवतरतो. वाळवंटातील जीवन या काळात थोडेसे का होईना सजीव होते. म्हणून 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे' असे म्हटले आहे.

**(2)** **व्युत्पत्ती कोश :** एखाद्या शब्दाबद्दलचे कुतूहल शमवण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो. व्युत्पत्ती कोशात आपल्याला मूळ शब्द कसा, केव्हा, कुठे निर्माण झाला हे तर कळतेच; परंतु अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे व कोणत्या रूपात आहे, हेही कळते. असा हा शब्दांचा जादूगार कसा अस्तित्वात आला हे समजून घेणे उद्बोधक ठरेल. १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला. कृ. पां. कुलकर्णी यांच्यावर संपादनाची जबाबदारी सोपवण्यात आली. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी अर्थसाहाय्य केले व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे निर्मितीस भरीव मदत झाली. अखेर १९४६ साली मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले.

**(3)** बार्क ⟶ बार्क म्हणजे B.A.R.C. म्हणजेच 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'चे लघुरूप (शॉर्ट फॉर्म) आहे. बार्कला मराठीत 'भाभा अणुसंशोधन केंद्र' असे म्हणतात. डॉ. होमी भाभा हे भारतातील थोर अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतामध्ये अणुसंशोधनाचा पाया घातला. भारताच्या अणुसंशोधनाचे होमी भाभा हे जनक होत. म्हणून त्यांचे नाव अणुसंशोधन केंद्राला दिले आहे. 'बार्क' ही संस्था प्रचंड मोठी व नावाजलेली आहे. ही संस्था अणुऊर्जेसंबंधित संशोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य आजतागायत निष्ठेने करीत आहे.

**प्र. 4. (अ)**

**(1)** (1) विधानार्थी वाक्य

(2) आज्ञार्थी वाक्य

**(2)** (1) विधानार्थी वाक्य – अरे पंत, खाण्याचा आणि वजनाचा काहीही संबंध नाही.

(2) होकारार्थी वाक्य – पहाटे रानात अंधार होता.

**(3)** (1) हातात हात घालणे – **अर्थ :** सहकार्य करणे.

**वाक्य :** गावातील विहीर खणण्यासाठी गावकऱ्यांनी एकमेकांच्या <u>हातात हात घातले.</u>

(2) चेहरा पडणे – **अर्थ :** शरम वाटणे.

**वाक्य :** चाचणीत कमी गुण मिळाले, म्हणून नीरजचा <u>चेहरा पडला.</u>

(3) कट करणे – **अर्थ :** कारस्थान करणे.

**वाक्य :** औरंगजेबाने शिवाजी महाराजांना आग्र्यात नजरकैदेमध्ये ठेवण्याचा <u>कट केला.</u>

**प्र. 4. (आ)**

**(1)** **(i)** (1) किमान × कमाल

(2) अपेक्षित × अनपेक्षित

**(ii)** दुसऱ्यावर उपकार करणारा – परोपकारी

**(iii)** (1) विहीर – विहिरी

(2) कल्पना – कल्पना

**(iv)** (1) पालवी – स्त्रीलिंग

(2) नाद – पुल्लिंग

**(2)** (1) बाजारात जाताना कापडी पिशवी जवळ ठेवावी.

(2) आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे.

**(3)** (1) ''तुम्ही कशा आलात इथपर्यंत?''

(2) पाय वाळक्या काटकीवर पडून 'कट' असा आवाज आला.

**प्र. 5. (अ), (आ) व (इ) ...**

**उपयोजित लेखनातील कृतींच्या स्वयं-मूल्यमापनाबाबत...**

उपयोजित लेखनाच्या कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तर लिहिताना स्वत:चे विचार, स्वत:च्या कल्पना स्वभाषेत लिहाव्यात, अशी अपेक्षा आहे. या कृतींची उत्तरे मुक्तोत्तरी स्वरूपाची असतात. विद्यार्थ्यांनी ही उत्तरे स्वत: लिहावीत.

या विषयातील सोडवून दिलेल्या पहिल्या कृतिपत्रिकेतील उपयोजित लेखनामधील कृतींची उत्तरे विद्यार्थ्यांनी अभ्यासावीत; गुणदान-पद्धतीतील मुद्दे विचारात घ्यावेत आणि स्वत: लिहिलेले उत्तर स्वत:च तपासण्याचा प्रयत्न करावा. गरजेनुसार आपल्या शिक्षकांचे मार्गदर्शनही घ्यावे.

***उपयोजित लेखनाच्या अधिक अभ्यासासाठी***

***'नवनीत मराठी (LL) उपयोजित लेखन : इयत्ता दहावी'***

***या पुस्तकात दिलेले उपयोजित लेखनाचे नमुने अवश्य वाचावेत.***